**<u>ठळक बातम्या</u>**

- देशभरात ६२ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चाच्या विविध युवक-केंद्रित उपक्रमांचं प्रधानमंत्र्यांच्या हस्ते अनावरण

- दोन वर्षांहून कमी वयाच्या बालकांना सर्दी-खोकल्याची औषधं देऊ नयेत, अशा केंद्रीय आरोग्य मंत्रालयाच्या राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांना सूचना

- अनुकंपा तत्वावर निवड झालेल्या दहा हजारांपेक्षा जास्त उमेदवारांना मुख्यमंत्र्यांच्या हस्ते नियुक्तीपत्रं प्रदान

- वेस्ट इंडिजविरूद्धच्या कसोटी क्रिकेट मालिकेतला पहिला सामना जिंकून भारताची मालिकेत एक-शून्यने आघाडी

**आणि**

- ज्येष्ठ अभिनेत्री संध्या शांताराम यांचं निधन

**<><><><>**

आजचा भारत कौशल्य विकासाला प्राधान्य देत असून युवावर्गाचं सामर्थ्य देशाला प्रगतीपथावर नेईल, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज देशभरात शिक्षण, कौशल्य आणि उद्योजकतेला चालना देण्याऱ्या ६२ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चाच्या विविध युवक-केंद्रित उपक्रमांचं अनावरण केलं, त्यावेळी ते बोलत होते. नवी दिल्लीत विज्ञान भवन इथं आयोजित कौशल्य दीक्षांत समारंभाला संबोधित करताना प्रधानमंत्री म्हणाले…

**- - - होल्ड… बाईट - प्रधानमंत्री - -**

प्रधानमंत्री विकसित भारत योजनेमुळे देशातल्या सुमारे साडे तीन कोटी युवकांना खाजगी क्षेत्रात नोकरी मिळण्याची द्वारं खुली होतील. बिहारमधल्या युवकांना बिहार मध्येच रोजगार मिळावा, यासाठी प्रयत्न सुरु आहेत, असं त्यांनी सांगितलं. यावेळी कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयाच्या अंतर्गत येणाऱ्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधल्या सर्वोत्तम ४६ जणांना प्रधानमंत्र्यांच्या हस्ते गौरवण्यात आलं.

<><><><>

नागपूर हे देशाच्या मध्यभागी असून नागपूरमधे देशाच्या हवाई वाहतूक क्षेत्राचं केंद्र बनण्याची क्षमता असल्याचं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी म्हटलं आहे. विकसित भारतामधे हवाई वाहतूक क्षेत्राची भूमिका या विषयावर नागपूरमधे आयोजित परिसंवादात ते आज बोलत होते. हवाई वाहतूकक क्षेत्राच्या सुरक्षिततेबद्दल कुठलीही तडजोड न करता या क्षेत्राला आत्मनिर्भर करावं असं आवाहन गडकरी यांनी केलं.

<><><><>

दोन वर्षांहून कमी वयाच्या बालकांना सर्दी-खोकल्याची औषधं दिली जाऊ नयेत, अशी सूचना केंद्रीय आरोग्य मंत्रालयानं दिली आहे. राजस्थान आणि मध्य प्रदेशमध्ये कथित कफ सिरपच्या सेवनानं काही मुलांचे मृत्यू झाल्याच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारनं हा सल्ला दिला आहे. पाच वर्षांहून कमी वयाच्या मुलांना साधारणपणे ही औषधे दिली जात नाहीत आणि पाच वर्षांपेक्षा मोठ्या वयाच्या मुलांसाठी या औषधांचा वापर सावधगिरीनं आणि डॉक्टरांच्या देखरेखीखाली करणं आवश्यक आहे, असं मंत्रालयानं जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांमध्ये म्हटलं आहे. सर्व राज्य आणि केंद्र शासित प्रदेशांच्या आरोग्य सेवा संचालकांना पत्र लिहून या सूचना केल्या आहेत.

<><><><>

बिहार मधल्या आगामी निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी निवडणूक आयोगानं आज मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या अध्यक्षतेखाली राज्यातल्या १२ प्रमुख राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींशी चर्चा केली. भाजपा, जनता दल संयुक्त, राष्ट्रीय जनता दल , काँग्रेस, डाव्या विचारसरणीचे पक्ष आणि इतर पक्षांच्या प्रतिनिधींशी त्यांनी चर्चा केली, निवडणूक स्वतंत्र आणि निष्पक्ष वातावरणात पार पडाव्यात यासाठी सर्व प्रतिनिधींनी आपापली मतं आणि सूचना सांगितल्या.

<><><><>

वस्तू आणि सेवा कररचनेतल्या सुधारणा २२ सप्टेंबरपासून लागू झाल्या आहेत. यानुसार ट्रक, डिलिव्हरी व्हॅन यासारख्या मालवाहतूक करणाऱ्या व्यावसायिक वाहनांवरचा जीएसटी २८ टक्क्यांवरून १८ टक्के करण्यात आला आहे. लघु आणि मध्यम मालवाहतूकदारांना सुलभपणे मालवाहतूक करता यावी या उद्देशानं केलेल्या या कर

कपातीमुळे देशातल्या दळणवळण क्षेत्राचं पुनरुज्जीवन होऊ शकेल. जीएसटी कमी झाल्यामुळे जीवनावश्यक वस्तूंच्या प्रति टन वाहतुकीचा दर कमी होऊन पुरवठा साखळीवर अनुकूल परिणाम होईल, तसंच निर्यातीतली स्पर्धा वाढेल.

<><><>

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आज मुंबईत आयोजित कार्यक्रमात अनुकंपा तत्वावरील गट क आणि गट ड मधल्या तसंच राज्य लोकसेवा आयोगातर्फे सरळसेवा भरतीद्वारे निवड झालेल्या एकूण दहा हजारांपेक्षा जास्त उमेदवारांना नियुक्तीपत्रं वितरीत करण्यात आली. प्रशासनाचं बळकटीकरण करायला सरकारचं प्राधान्य आहे, संस्थात्मकदृष्ट्या प्रशासनाला बळकट केलं तरच प्रशासन गतीशील, संवेदनशील आणि लोकाभिमुख होऊ शकतं, असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.  या दृष्टीनं अनुकंपा तत्वावरील शासन निर्णयात सुधारणा केल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. अनुकंपा तत्वावरल्या ८० टक्के जागा भरल्या असून उरलेल्या जागा काही दिवसात भरल्या जातील असंही मुख्यमंत्री म्हणाले.

दरम्यान, गडचिरोली मधे आयोजित कार्यक्रमात सहपालकमंत्री आशीष जयस्वाल यांच्या हस्ते अनुकंपा आणि सरळसेवा पदभरतीच्या २१० उमेदवारांना नियुक्तीपत्रं प्रदान करण्यात आली.

<><><>

भारतानं वेस्ट इंडिजविरूद्धच्या कसोटी क्रिकेट मालिकेतला पहिला सामना एक डाव आणि १४० धावांनी जिंकून मालिकेत १ - ० अशी आघाडी घेतली आहे. भारतानं आज तिसऱ्या दिवशीच वेस्ट इंडिजचा पराभव केला. आजच्या दिवसाचा खेळ सुरु झाला तेव्हा भारतानं आपला पहिला डाव ५ बाद ४४८ धावांवर घोषित केला. त्यावेळी भारताकडे २८६ धावांची आघाडी होती. त्यांनतर फलंदाजीला आलेल्या वेस्ट इंडिजच्या दुसऱ्या डावाची सुरुवात निराशाजनक झाली. भारताच्या गोलंदाजांनी उत्तम कामगिरी करत वेस्ट इंडिजला जम बसवू दिला नाही. वेस्ट इंडिजच्या अलिक अथानाझे याच्या ३८ धावा वगळता इतर कोणताही खेळाडू आपली चमक दाखवू शकला नाही. केल्या. वेस्ट इंडिजचे फलंदाज झटपट बाद होत गेल्यानं त्यांना मोठी धावसंख्या उभारता आली नाही, त्यांना सर्व बाद

१४६ धावाच करता आल्या. रविंद्र जडेजानं चार, मोहम्मद सिराजनं तीन, कुलदीप यादवने दोन, तर वॉशिंग्टन सुंदरनं एक गडी बाद केला.

**<><><>**

महिला विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत भारताचा सामना पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तान बरोबर उद्या श्रीलंकेतल्या कोलंबो इथल्या आर प्रेमदासा स्टेडियमवर होणार आहे. पाकिस्तानबरोबर आतापर्यंत झालेल्या सर्व प्रकारच्या सामन्यांमध्ये भारतानं २७ पैकी २४ सामन्यांमध्ये विजय मिळवला आहे.

**<><><>**

ज्येष्ठ अभिनेत्री आणि नृत्यांगना संध्या शांताराम यांचं काल निधन झालं. त्या ८७ वर्षांच्या होत्या. निर्माता आणि दिग्दर्शक व्ही. शांताराम यांच्या नवरंग या चित्रपटातून त्यांना प्रसिद्धी मिळाली होती. अरे जा रे हट नटखट हे त्यांचं गाणं लोकप्रिय ठरलं. त्याशिवाय झनक झनक पायल बाजे, जल बिन मछली- नृत्य बिन बिजली, दो आँखे बारह हात, अमर भूपाळी, पिंजरा अशा विविध चित्रपटांमधून त्यांनी केलेल्या भूमिका गाजल्या. संध्या यांच्या पार्थिवावर आज शिवाजी पार्क इथल्या स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशीष शेलार यांनी संध्या यांना आदरांजली वाहिली आहे.

**<><><>**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या शिरोडा - वेळानगर इथल्या समुुद्रात काल संध्याकाळी ९ पर्यटक बुडाले. यातल्या पाच जणांचा मृत्यू झाला असून दोघे जण अद्याप बेपत्ता आहेत. तर दोघांवर उपचार सुरू आहेत. हे पर्यटक बेळगाव आणि कुडाळ इथून सिंधुदुर्गात फिरण्यासाठी आले होते. ते काल संध्याकाळी समुद्रात उतरले असता समुद्राला भरती आल्यामुळे एका मोठ्या लाटेसोबत ते सर्वजण पाण्यात वाहून गेले.

**<><><>**

शक्ती चक्रीवादळाचं केंद्र गुजरातच्या द्वारकेहून सुमारे ३४० किलोमीटर पश्चिमेकडे असल्याची माहिती हवामान विभागानं दिली आहे. पश्चिमेकडून नैऋत्येकडे पुढे सरकत या चक्रीवादळाची तीव्रता वाढणार असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. हे चक्रीवादळ उद्यापर्यंत उत्तरेकडच्या मध्यवर्ती भागांपर्यंत आणि त्याला लागून असलेल्या अरबी समुद्राच्या मध्यापर्यंत पोहोचेल. सोमवारी ते पुन्हा फिरून पूर्व-इशान्येकडे सरकणार आहे.

आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
४ ऑक्टोबर २०२५ - शनिवार

**<><><><>**

खासदार डॉ. शोभा बच्छाव यांनी आज धुळे जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे झालेल्या पिकांच्या नुकसानीची पाहणी केली. जास्तीत जास्त नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी केंद्र आणि राज्य शासनाकडे पाठपुरावा करण्याचं आश्वासन त्यांनी यावेळी दिलं. तसेच सरसकट भरपाईची मागणी करत पाहणी अहवाल राज्यपालांकडे सादर केला जाईल, असंही त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

पालघर जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातल्या अनेक भागात भात आणि चिकू शेतीचं, तसंच घरांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे.  जिल्ह्यातल्या डहाणू आणि तलासरी तालुक्यात अतिवृष्टीमुळे झालेल्या शेती आणि घरांच्या नुकसानीची पाहणी जिल्हाधिकारी डॉ. इंदुराणी जाखड यांनी केली. यावेळी त्यांनी विविध भागातल्या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांशी आणि नागरिकांशी संवाद साधत शासनाकडून तातडीनं मदत देण्याचं आश्वासन दिलं.

**//<><><><>//**